संच : अ

# ५ वी मराठी

**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे-३०.**

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**

**शैक्षणिक प्रगती चाचणी**

**पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - पाचवी**

**विषय : मराठी (लेखी)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ____________________

**शाळेचे नाव :** ____________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** ______ **शिक्षकाची स्वाक्षरी** ______ **एकूण गुण :** ४०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ____________________ २) ____________________

३) ____________________ ४) ____________________

५) ____________________ ६) ____________________

७) ____________________ ८) ____________________

९) ____________________ १०) ____________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

आमच्या शेवग्याच्या पांढऱ्याशुभ्र फुलांच्या घोसांवर रुंजी घालत गुंजारव करणाऱ्या जांभळट-काळ्या टपोऱ्या भुंग्याची व माझी भेट झाली. फुलांमधला मध पिऊन फुलांभोवती नाचणाऱ्या मधमाश्या मी पाहिल्या शेवग्यामुळे. अलगद हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ फुलचुख्यांची झुंबड मला दिसली. मधानं गच्च भरलेल्या फुलांतून हवेत अलगद मध चोखण्याची कला पाहावी ती फुलचुख्यांची. इटुकला बोटभर फुलचुख्या असतो मात्र कसरतपटू. एरवी मला कधीच दिसला नसता, फक्त आवाजच ऐकून होते, तो तांबट पक्षी मनमुरादपणे मान खाली-वर करत, अगदी एकाग्रतेनं तुक्तुक् आवाजाचा टणत्कार करताना मला चक्क दिसला. भर उन्हात शेवग्याच्या उंच उंची फांदीच्या शेंड्यावर कोकीळ पक्षीही शांतपणे झुलताना मी पाहिला. छोटे छोटे हिरव्या राघूंचे थवेच्या थवे उलगत उडत उडत, हवेत तरंगत कधी किडे तर कधी परागकेशरांचा फन्ना उडवताना पाहिलं.

**प्रश्न २.** फुलांभोवती कोणता प्राणी नाचतो. योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) फुलचुख्या

ब) भुंगा

क) मधमाश्या

**प्रश्न ३.** उताऱ्यात एकूण किती प्राणी, पक्षी आणि कीटक यांचा उल्लेख आलेला आहे. (गुण २)

______________________________

**प्रश्न ४.** फुलचुख्याला कसरतपटू का म्हटले आहे? (गुण २)

______________________________

______________________________

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-III\19-06-17\GJ*

**संच : अ**

**प्रश्न ५ ते ७ साठी :** ही कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

**झुळूक मी व्हावे**

वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे,
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे.

कधि बाजारी तर कधी नदीच्या काठी,
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी
हळु थबकत जावे कधि कानोसा घेत,
कधि रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार,
ती फुलुनि बघे तो व्हावे पार पसार,
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा,
तो दिशदिशांतुनि फिरता उधळुनि द्यावा

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर,
झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर
शेतांत पाचुच्या, निळ्या नदीवर शांत,
खुलवीत मखमली तरंग जावे गात

(दा. अ. कारे)

**प्रश्न ५.** कवीला कोण व्हावेसे वाटते? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) नदी  ब) झुळूक  क) झाड

**प्रश्न ६.** कवीला भरारी घेऊन कोठे-कोठे जावेसे वाटते, ते लिही. (गुण २)

________________________________________

________________________________________

**प्रश्न ७.** कवी कधी पळून जाणार आहे, हे तुझ्या शब्दात लिही. (गुण २)

________________________________________

________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न ८ ते १० साठी :** खालील जाहिरात वाच. त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.

# खुशखबर! खुशखबर!! खुशखबर!!!

**'धमाल ग्रुप' पुणे आयोजित बालसाहित्य जत्रा**

**काय पहाल व काय घ्याल?**

१) बालकथा संग्रह
२) कविता संग्रह
३) बालनाट्य
४) एकांकिका संग्रह
५) नाट्यछटा व विनोदी पुस्तके
६) चित्रकला, हस्तकला संबंधी पुस्तके

- प्रत्येक पुस्तकावर ५०% ची घसघशीत सूट
- बालकांसाठी निबंध लेखन, काव्यलेखन, चित्रकला स्पर्धा
- विजेत्यांना नामांकित लेखकांच्या हस्ते आकर्षक पुस्तकभेट!

**सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य!**

- **'बालसाहित्य जत्रा' कालावधी : दि. १० जून ते १३ जून २०१७**
- **वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५**
- **स्थळ : महात्मा फुले सांस्कृतिक भवन, पुणे.**

**प्रश्न ८.** स्पर्धेतील विजेत्यांना कोणते बक्षीस मिळणार आहे? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) वस्तू ब) पुस्तक क) रोख रक्कम

**प्रश्न ९.** बालसाहित्य जत्रेतील पुस्तक खरेदी करणे फायद्याचे ठरेल का? (गुण २)
हे तुला कशावरून समजले?

______________________________

______________________________

**प्रश्न १०.** इयत्ता ५वी मधील लीलाच्या आजोबांना या 'बालसाहित्य जत्रेसाठी' जाता येईल का?
हे तुला कोणत्या वाक्यावरून समजले? (गुण २)

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-III\19-06-17\GJ

## संच : अ

**प्रश्न ११ ते १३** मध्ये दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाऐवजी कंसातील शब्द वापर. आवश्यक बदल करून वाक्य पुन्हा लिही.

**प्रश्न ११.** मारियाने आईस्क्रिम खाल्ले. (केक) (गुण १)

______________________________

**प्रश्न १२.** अहमदने होड्या तयार केल्या. (होडी) (गुण १)

______________________________

**प्रश्न १३.** समीर उद्या गावाला जाईल. (आज) (गुण १)

______________________________

**प्रश्न १४.** 'टाळाटाळ करणे' या वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य लिही. (गुण १)

______________________________

______________________________

**प्रश्न १५.** खालील शब्दांना उपसर्ग जोडून तयार होणारा प्रत्येकी एक शब्द लिही.

जसे : चर - भूचर, निशाचर, उभयचर, (गुण १)

१) मान : ______________________________

२) मंगल : ______________________________

**प्रश्न १६.** खालील वाक्यात योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिही. (गुण १)

महाराजांनी विचारले, काय नाव बाळांनो तुमचं

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न १७.** खालील वाक्यांचा योग्य क्रम लावून वाक्ये पुन्हा लिही. (गुण २)

सर्वांनी पेढे खाल्ले.

त्याने पेढे आणले.

रोहनचा स्पर्धेत प्रथम क्रमांक आला.

पेढे सर्वांना वाटले.

रोहन मिठाईच्या दुकानात गेला.

**प्रश्न १८.** 'वावर' या शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ लक्षात घेऊन प्रत्येक अर्थाचे एक वाक्य लिही. (गुण २)

जसे : पाट – नानी पाटावर बसली. (अर्थ : पाट – बसण्यासाठीचा पाट)

पाट – शेताला पाटाने पाणी देतात. (अर्थ : पाट – शेतातील पाणी वाहण्यासाठीचा मार्ग)



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न १९.** खाली दिलेल्या प्रसंगाच्या आधारे एक गोष्ट लिही. (गुण ५)

आमच्या शाळेत स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम रात्री चालू होता. सर्वजण कार्यक्रम पाहण्यात दंग झाले होते. अचानक वीज गेली................



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न २०.** खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही. (गुण ५)

तलाव, घोडा, माणूस, शेत,



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 5th \Proof-III\19-06-17\GJ*